# 'अग्री सोलर'ची उपकरणे बाजारात



औरंगाबाद, ता. १८ : पुण्याच्या 'अग्री सोलर सिस्टिम्स प्रायव्हेट लिमिटेड' या सौर ऊर्जेवरील उपकरणांची निर्मिती करणाऱ्या कंपनीची 'मिनी सोलर वॉटर हिटर' व 'मिनी सोलर इमरजन्सी लॅंप' ही उपकरणे बाजारात दाखल झाली आहेत. 'मिनी सोलर वॉटर हिटर' हे उपकरण ५०, ७५ व १०० लिटर अशा तीन वेगवेगळ्या प्रकारांमध्ये उपलब्ध आहे. या उपकरणांची किंमत नऊ हजार, अकरा हजार व तेरा हजार रुपयांपर्यंत आहे. 'मिनी सोलर इमरजन्सी लॅंप' हा दीड हजार रुपयांना उपलब्ध आहे. हा लॅंप एकदा चार्ज केल्यावर तीन तास प्रकाश देऊ शकतो. सौर ऊर्जेबरोबरच हा लॅंप कमी सूर्यप्रकाश असताना विजेवरही चार्ज केला जाऊ शकतो, अशी माहिती कंपनीचे संचालक रवी पिट्टी, विपणन व्यवस्थापक उदय निकम यांनी पत्रकार परिषदेत दिली. 'अग्री सोलर वॉटर हिटर' हे उपकरण 'आयएसआय' दर्जाच्या परिमाणांनुसार तयार केले आहे. दर्जेदार 'सोलर कलेक्टर्स', 'टफन्ड ग्लास शीट', ऊर्जा संकलन करणाऱ्या तांब्याच्या प्लेट, व्यवस्थित इन्सुलेशन केलेली गरम पाणी साठविण्याची टाकी ही या उपकरणांची वैशिष्ट्ये आहेत, असेही श्री. पिट्टी यांनी सांगितले. अधिक माहितीसाठी कंपनीचे येथील अधिकृत विक्रेते, भास्करा सिस्टिम्स, (दूरध्वनी ४७०२१०, ९८९००४३४४२) येथे संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले.